२६९५ २६३
साकेताक क्र २००४१०१५२२

९२९

५८
क्र-५६ (९०४)

**क्रमांक :एकत्रीकरण /तक्रारी अर्ज /२००४.**
जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि
अभिलेख, म.राज्य. पुणे यांचे कार्यालय.
पुणे , दिनांक १३/१०/२००४.

15 OC 2004

**परिपत्रक**

**विषय :-** एकत्रीकरण योजना.
योजनेतील तरतुदीनुसार त्रुटी / दुरुस्ती बाबतचे अधिकार.

मुंबईचा धारण जमीनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करणे व त्यांचे एकत्रीकरण करणे याबाबत अधिनियम १९४७ मधील तरतुदीनुसार भूमि अभिलेख विभागाकडून , एकत्रीकरण योजनेची अम्मलबजावणी ते योजना राबविणेस सन १९९३ मध्ये शासनाने दिलेली स्थगिती या दरम्यान ज्या गांवी योजना राबविणेत आलेली आहे व कार्यान्वित झालेल्या योजनेबद्दल , योजनेतील अनवधानाने झालेल्या चुका, उणिवा ,त्रुटी याबाबत अनेक प्रकारचे तक्रारी येतात व त्या स्विकृत करुन, एकत्रीकरण कायदयातील कायदा कलम ३१(अ) अन्वये शुध्दीपत्रके अवलंबून . योजनेतील योग्य त्या दुरुस्त्या केल्या जातात.

एकत्रीकरण कायदा कलम ३६ए(१), ३६(बी) १ मधील तरतुदी विचारात घेवून जमाबंदी आयुक्त तसेच उपसंचालक भूमि अभिलेख / अधीक्षक भूमि अभिलेख यांचे स्तरावरुन तक्रारी संदर्भात करणेत येत असलेली कार्यवाही ही केन्द्र शासनाने मंजूर केलेल्या कायदयानुसार होत असून, मामलेदार कोर्ट किंवा दिवाणी न्यायालये यांना एकत्रीकरण वादा संदर्भात दावे चालविण्यास प्रतिबंध करण्ात आलेला आहे. व एकत्रीकरण योजनेवरील अशा तक्रारीबाबत करावयाची कार्यवाही ही, महसूल विभागातील भूमि अभिलेख खात्याचे महाराष्ट्रातील प्रमुख म्हणून जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, (महाराष्ट्र राज्य)पुणे यांचे अधिपत्याखाली पूर्ण करणेत येत आहे. त्यानुसार या कायदयातील तरतुदीनुसार जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, (महाराष्ट्र राज्य )पुणे यांना प्रदान करणेत आलेले अधिकार हे कामाचे सोईचे दृष्टीने शासनाचे अव्वर सचिव यांचेकडील क्रमांक : सीआएन १०९८/ ७६३/ सीआर ९८/ एल १/ दिनांक ५ फेब्रुवारी २००० व महाराष्ट्र शासन राजपत्र ३१ ऑगस्ट २००१ अन्वये महसूल विभागानुसार उपसंचालक भूमि अभिलेख पुणे / मुंबई / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर यांना एकत्रीकरण योलजनेतील कायदा कलम ३२(१) खाली तसेच का.क. ३१ अ खाली अधीक्षक भूमि अभिलेख यांना त्या शक्ति / अधिकार प्रदान करणेत आलेले आहेत. त्याचप्रमाणे कायदा कलम ३४ खालील अधिकार देखील प्रशासनाचे कामाचे सोईचे दृष्टीने एकत्रीकरण अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख या संवर्गातील अधिकारी यांना यापूर्विच प्रदान करणेत आलेले आहे.

एकत्रिकरण कायदा कलम ३६ बी नुसार दिवाणी न्यायालयात जर दावा दाखल झाला असेल अशा प्रकरणात जर एकादी बाब ही या कायदयानुसार सक्षम अधिका-याने निर्णय करण्याजोगी असेल तर अशा दाव्याबाबत कोर्टाने देखील अशा सक्षम अधिकारी यांचेकडे ती सोपवली पाहिजे असे नमूद केले आहे.

उपरोक्त बाबी विचारात घेवून ,एकत्रीकरण योजनेवरील तक्रारीचे संदर्भात याबाबी दिवाणी न्यायालये तसेच मामलेदार कोर्ट यांचे निदर्शनास आणून देवून उपरोक्त तरतुदीचे विरोधात एखादया प्रकरणात वेगळा निर्णय लागू नये व शेतक-यावर अन्याय होवू नये म्हणून या बाबी संबंधिताना वेळीच निदर्शनास आणून देणेची कार्यवाही व्हावी.

जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भूमि अभिलेख (म.राज्य.) पुणे यांचे करिता

प्रत/- रजिष्ट्रार मा. उच्च न्यायालय ,मुंबई खंडपीठ / खंडपीठ नागपूर / औरंगाबाद .
प्रत/- रजिस्ट्रार जिल्हा न्यायालय ,(सर्व) शासकीय अभियोक्ता कार्यालय मुबंई, नागपूर,औरगांबाद,
प्रत/- शासकीय अभियोक्ता कार्यालय,जिल्हा...............
प्रत/- उपसंचालक भूमि अभिलेख (सर्व )..................
प्रत /- अधीक्षक भूमि अभिलेख,जिल्हा...................
प्रत/- तालुका निरीक्षक भूमि अभिलेख,..................